# प्रेसनोट

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/ ६८०२/२०१९ पुणे शहर, दिनांक -२१/०८/२०१९.

**विषय** :- **दहीहंडी उत्सवानिमीत्त करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

---

दिनांक २४.०८.२०१९ रोजी दहीहंडी उत्सव पुणे शहरात ठिकठिकाणी मोठया उत्साहात साजरा केला जातो. विशेषतः शहरातील मध्यवर्ती भागातील शिवाजीरोड,लक्ष्मीरोडवर सायंकाळी १७.०० वा. पासून दहीहंडी फुटे पर्यंत बुधवार चौक ते दत्तमंदीर चौक दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यावेळी सदर रस्त्यांवर कोठेही वाहतूकीची कोंडी होऊ नये व वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकते** नुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थिनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये .खालील प्रमाणे बदल करण्यात येतील त्याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

१. शिवाजीरोडवरुन स्वारगेटच्या दिशेने जाणा-या पीएमपीएमएल बसेस शिवाजीनगर येथील स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने पुढे टिळकरोडने स्वारगेटकडे जातील.

२. शिवाजीरोडवरुन पुणे स्टेशन,हडपसरकडे जाणा-या बसेस जिजामाता चौकातुन डावीकडे वळून फडके हौद ,दारुवाला पूल मार्गे इच्छितस्थळी जातील.

३. शिवाजीरोडवरुन स्वारगेटकडे जाणारी इतर हलकी वाहने व दुचाकी वाहने जिजामाता चौकातून डावीकडे वळून फडके हौद चौक-देवजीबाबा चौक- हमजेखानचौक-मार्गे सरळ स्वारगेटकडे जातील व इतर वाहने बुधवार चौकातून उजवीकडे वळून आप्पा बळवंत चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.

४. लक्ष्मी रोड वरुन बेलबाग चौकाकडे जाणारी सर्व वाहतुक सोन्या मारुती चौकाकडून उजवीकडे वळून पुढे फडके हौद चौक - जिजामाता चौक- बुधवार चौक-आप्पा बळवंत चौक मार्गे पुढे इच्छितस्थळी जातील.

सदर भागातील वाहतूक परिस्थिती नुसार आवश्यकते प्रमाणे बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी सायंकाळी १७.०० ते दहीहंडी फुटे पर्यंत उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**( सही/- )**
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक,
पुणे शहर .

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३,४,५ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत सादर,
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर